# विद्युत लोकपाल (मुंबई)

(विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ४२(६) अंतर्गत)

अभिवेदन (Representation) क्रमांक ५४ / २०२०

## कृषीपंप नवीन वीज जोडणी बाबत

शिवराम यशवंत पेंढारी ........................................................................................................ अपिलार्थी

विरूध्द

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी (महावितरण) ....................................................................... प्रतिवादी

ई-सुनावणी तारीख :- २४ जुलै २०२०

उपस्थिती :-

अपिलार्थीतर्फे :- १) शिवराम यशवंत पेंढारी

२) आनंद शिवराम ओक, ग्राहक प्रतिनिधी

प्रतिवादीतर्फे :- कैलाश पी. लवेकर, कार्यकारी अभियंता, चिपळूण

कोरम :- दिपक लाड

आदेश पारित दिनांक :- २९ जुलै २०२०

## आदेश

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ (यापुढे ज्याचा उल्लेख 'ग्राहक गाऱ्हाणे विनियम २००६' असा केला जाईल) मधील विनियम १७.२ अन्वये ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, महावितरण, रत्नागिरी परिमंडळ, (यापुढे ज्याचा उल्लेख

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

'मंच' असा केला जाईल) यांच्या दिनांक २३ डिसेंबर २०१९ च्या आदेशाविरुध्द उपरोक्त अपिलार्थीने सदरचे अभिवेदन दिनांक ३० जन 2020 रोजी दाखल केलेले आहे.

२. मंचाने त्यांच्या तक्रार अर्ज क्रमांक १८/२०१९ बाबत दिनांक २३ डिसेंबर २०१९ रोजी खालीलप्रमाणे आदेश पारित केला.

*"१) तक्रारदाराचा अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे.*

*२) तक्रारदाराने दि. ०९/०८/२०१८ रोजी नवीन शेती पंपाचे वीज जोडणी बाबतचा केलेला अर्ज मंजूर करून आदेश झाल्यापासून एक महिन्याच्या आत सदर वीज जोडणी देण्यात यावी."*

३. अपिलार्थीने त्यांच्या निवेदनात सादर केलेले प्रमुख मुद्दे खालीलप्रमाणे आहेत.

३.१) अपिलार्थीने कृषीपंपाकरीता नवीन वीज जोडणीचा विहित नमुन्यातील अर्ज योग्य कागदपत्रासह दिनांक ९ ऑगष्ट २०१८ रोजी प्रतिवादी महावितरण (चिपळूण उपविभाग) यांच्या कार्यालयात सादर केला.

३.२) दिनांक ७ सप्टेंबर २०१८ रोजी सदरचे अंदाजपत्रक मंजूर करण्यात आले व अपिलार्थीने अंदाजपत्रकाची आवश्यक ती रक्कम रु.२३९१/- दिनांक ३ ऑक्टोबर २०१८ रोजी भरणा केला.

३.३) महावितरणने दिनांक २९ जानेवारी २०१९ रोजीच्या पत्रान्वये सौर कृषीपंप योजने अंतर्गत लाभ घेण्याकरीता ऑनलाईन पध्दतीने आवश्यक कागदपत्रे व हमीपत्रासह अर्ज करण्यास सांगितले. परंतू अपिलार्थीस सौर कृषीपंप योजने अंतर्गत वीज जोडणीत स्वारस्य नव्हते. त्यामुळे सदरचा अर्ज सादर केला नाही.

३.४) अपिलार्थीने अभिवेदनात नमुद केले आहे की, सदर परिपत्रकानुसार या योजने अंतर्गत वीज जोडणी घेणे बंधनकारक नाही. तसेच त्या परिपत्रकात लाभार्थी हा शब्दप्रयोग केलेला आहे व या अंतर्गत त्यांना कोणताही लाभ घ्यावयाचा नाही. पारंपारिक

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

पध्दतीने वीज जोडणी करण्यात यावी अशी अपिलार्थीची मागणी आहे. अपिलार्थी याची १.५ अश्वशक्तीचीच मागणी असल्याने सौर कृषीपंप योजना अपिलार्थीसाठी योग्य नाही.

३.५) सदर नवीन कृषीपंपासाठी योग्य ती कार्यवाही झाली नाही म्हणून अपिलार्थीने दिनांक १५ जुन २०१९ रोजी अंतर्गत तक्रार निवारण कक्षाकडे (कक्ष) तक्रार दाखल केली. कक्षाने अपिलार्थीस HVDS योजने अंतर्गत नवीज वीज जोडणी देण्यात यावी असे आदेश दिले. कक्षाच्या आदेशानंतरही वीज जोडणी वेळेत झाली नाही म्हणून मंचाकडे तक्रार दाखल केली. मंचानेही दिनांक २३ डिसेंबर २०१९ रोजी अपिलार्थीस एक महिन्याच्या आत वीज जोडणी देण्यात यावी असा आदेश पारीत केला. त्यानुसार दिनांक २० जानेवारी २020 रोजी वीज जोडणी देण्यात आली.

३.६) नागरिक म्हणून अपिलार्थी यांना वीज जोडणी मिळण्याचा हक्क आहे त्यासाठी अपिलाथींस भरपूर परिश्रम करावे लागले. बराच पत्रव्यवहार करावा लागला, तरीही वेळेत वीज जोडणी मिळाली नाही म्हणून कक्षाकडे, मंचाकडे दाद मागावी लागली. मंचाच्या आदेशाने मला वीज जोडणी मिळाली परंतू त्यासाठी झालेल्या खर्चाचा विचार केला गेला नाही. म्हणून अपिलार्थी यांना विद्युत लोकपाल यांच्याकडे दाद मागावी लागत आहे.

३.७) अपिलार्थी यांनी या अभिवेदनात अशी विनंती केली की,

अ) मा. आयोगाच्या कृती मानकांच्या नियमानूसार रू.४,७८२/- इतकी रक्कम भरपाईपोटी मंजूर व्हावी.

ब) मानसिक त्रासापोटी रू.१०,०००/- मंजूर व्हावेत.

क) खर्चापोटी रू.२,३००/- अशी नुकसानभरपाई म्हणून मजूर व्हावो.

४. प्रतिवादी यांनी १३ जुलै २020 च्या उत्तरात नमुद केले आहे की,

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

४.१) अपिलार्थी यांनी दिनांक ९ ऑगष्ट २०१८ रोजी कृषीपंपासाठी नवीन वीज जोडणीचा अर्ज केला तो प्रतिवादी महावितरण कार्यालयास दिनांक १४ ऑगष्ट २०१८ रोजी प्राप्त झाला. सदर अर्जाची छानणी करुन दिनांक ७ सप्टेंबर २०१८ रोजी तो मंजूर करण्यात आला. त्यानंतर दिनांक ३ ऑक्टोबर २०१९ रोजी अपिलार्थीने नवीन जोडणीसाठी आवश्यक असलेल्या अंदाजपत्रकाची रक्कम रु.२३९१/- चे ऑनलाईन प्रणालीमार्फत भरणा केले.

४.२) त्याच दरम्यान महाराष्ट्र शासनाच्या दिनांक १५ नोव्हेंबर २०१८ च्या शासन निर्णयानुसार व महावितरणच्या दिनांक २४ जानेवारी २०१९ च्या आदेशानुसार दिनांक ३१ मार्च २०१८ नंतरच्या नवीन कृषी वीज जोडणी अर्जदारांना वीज जोडणी पारंपारिक वीज जोडणी (लघुदाब वीज वाहिणी) ऐवजी सौर उर्जा कृषीपंप देण्याचे धोरण निश्चित झाले. त्यानुसार अपिलार्थी यांना दिनांक २९ ऑक्टोबर २०१८ च्या पत्रान्वये मुख्यमंत्री सौर कृषीपंप योजनेचा लाभ घेण्याचे कळविण्यात आले. परंतू अपिलार्थी यांनी तसा कोणताही ऑनलाईन अर्ज केला नसल्याने त्यावर पुढील कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही.

४.३) मंचाने अपिलार्थी यांना आदेशाच्या दिनांकापासुन एक महिन्याच्या आत वीज जोडणी देण्यात यावी असा आदेश दिला. त्याच दरम्यान प्रतिवादी महावितरणच्या मुख्यालयाच्या निर्देशानुसार सिंगल फेज स्वरूपाची मागणी असलेले प्रलंबित शेती पंपाच्या जोडण्या HVDS योजनेत न देता उपलब्ध असलेल्या लघुदाब वाहिनोवरून देण्यात याव्यात असे निश्चित केले, त्यामुळे सिंगल फेज स्वरूपाच्या ग्राहकांची कामे जेष्ठता यादी नुसार सुरू करण्यात आली. या आदेशानुसार अपिलार्थी यांच्या शेतीपंपाला वीज जोडणी दिनांक २० जानेवारी 2020 रोजी देण्यात आली आहे.

४.४) अपिलार्थी यांच्या अभिवेदनात वीज जोडणीच्या विलंबाबाबत उल्लेख आहे, मात्र अपिलार्थी यांचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर प्रतिवादी महावितरणच्या मख्यालयाच्या निर्देशानुसार सदर अर्जास मंजूरी देऊन त्याचा जेष्ठता यादीत समावेश करण्यात आला होता. तसेच मार्च २०१८ नंतरच्या सर्व कृषीपंप ग्राहकाना सौर उर्जेवर चालणाऱ्या

पंपाद्वारे जोडणी देण्याचा निर्णय शासन स्तरावर झाला होता. कक्षाने अपिलार्थी यांना HVDS योजने अंर्तगत जोडणी द्यावी असा कक्षाने निर्णय दिला, परंतू महावितरणच्या चिपळूण उपविभागातर्फे प्रलंबित जेष्ठता यादी नुसार कार्यवाही सुरू होती.

४.५) याच दरम्यान अपिलार्थी यांनी मंचाकडे तक्रार दाखल केली. मंचाने दिनांक २३ डिसेंबर २०१९ च्या आदेशान्वये एक महिन्यात जोडणी देण्याचे आदेश दिले. परंतू दरम्यान वेळी मुख्यालयाच्या आदेशानुसार सिंगल फेज स्वरूपाची मागणी असलेल्या प्रलंबित कृषीपंप अर्जदारास वीज जोडणी हे उपलब्ध असलेल्या लघुदाब वाहिनोवरून देण्यात याव. त्यानुसार जेष्ठता यादी नुसार कामे सुरू करण्यात आली. अपिलार्थी यांचे जोडणीबाबत प्रतिवादी महावितरणने कोणताही जाणीवपूर्वक उशीर केलेला नाही व शासन धोरणाच्या अधिन राहून योग्य ती कार्यवाही केली. सबब, अपिलार्थी यांच अभिवेदन फेटाळण्यात याव अशी मागणी उत्तरात केली.

५. अपिलार्थी यांचे दिनांक ८ मार्च २०20 चे अभिवेदन विद्युत लोकपाल मुंबई यांचे कार्यालयात दिनांक ३० जन २०20 रोजी प्राप्त झाले. कोवीड-१९ मुळे सदर अभिवेदनाची ई-सुनावणी दिनांक २४ जुलै २०20 रोजी व्हिडीओ कॉन्फरंसद्वारे ठरविण्यात आली. तथापि सुनावणी दरम्यान सिग्नल स्ट्रेन्थ बरोबर नसल्यामुळे सुनावणी व्हिडीओ कॉन्फरंसद्वारे न घेता ती दोन्ही पक्षकारांच्या संमतीने ऑडीओ कॉन्फरंसद्वारे घेण्यात आली.

सनावणी दरम्यान दोन्ही पक्षांनी युक्तिवाद केला. दोन्ही पक्षांनी आपल्या लेखी निवेदनातील मुद्दे पुनश्चः मांडले. मंचाने नुकसान भरपाई व खर्च याबाबत काहीही आदेश न दिल्यामुळे सदरचे अभिवेदन सादर केल्याचा असा युक्तीवाद अपिलार्थींनी केला.

प्रतिवादीने नमुद केले की, मंचाच्या आदेशानुसार एक महिन्याच्या आत अपिलार्थी यांना वीज जोडणी दिलेली आहे. अपिलार्थी यांच्या वीज जोडणीबाबत प्रतिवादी महावितरणकडुन कोणताही जाणीवपुर्वक उशीर झालेला नाही. शासन धोरणास अनुसरूनच महावितरण तर्फे निर्णय घेण्यात आलेत. त्यामुळे अपिलार्थीची मागणी फेटाळण्यात यावी.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

विश्लेषण व निर्णय

६. दोन्ही पक्षकारांचे म्हणणे एकण्यात आले व कागदपत्रांचे अवलोकन करण्यात आले. कृषीपंपासाठी नवीन वीज जोडणीचा सवथाने परिपुर्ण अर्ज सादर केलेल्या दिनांकापासून विशिष्ट मुदतीत वीज जोडणी मिळण्याचा ग्राहकास कायदेशीर हक्क आहे. नवीन शेतीपंपासाठी वीज जोडणी दण्यासंदर्भात प्रतिवादी महावितरणकडुन काही योजना व निकष तयार केले आहेत. त्याचप्रमाणे शासनाच्या आदेशानुसारही योग्य ती प्रक्रिया राबविण्यात आली व त्यानुसार प्रतिवादीने योग्य ती कार्यवाही केली. अपिलार्थी यांचे कृषीपंपाकरीता पारंपारिक पध्दतीने वीज जोडणी बाबतचा निर्णय घेतला. मात्र या दरम्यान अपिलार्थी यांनी मंचाकडे तक्रार दाखल केली व प्रतिवादीने वीज जोडणी देऊन मंचाच्या आदेशाचे पालनही केलेले आहे.

वरील सर्व बाबीचा विचार केल्यावर मी, या निष्कर्षापर्यंत आलो आहे की, प्रतिवादीने शासन धोरणास अनुसरून काही योजना व निकष तयार केले आहेत. तसेच वीज जोडणी देण्या संबंधात वेळोवेळी निरनिराळया योजना व मार्गदर्शक तत्वे ठरविले जातात. शिवाय शासनाने वेळोवेळी ठरविलेल्या धोरणा अंतर्गत योग्य ते बदल करणे प्रतिवादीस क्रमप्राप्त असते. हे जरी सत्य असले तरीही कृती मानके २०१४ अनुषंगाने प्रतिवादी तर्फे कार्यवाही अपेक्षित आहे.

अपिलार्थीने दिनांक ९ ऑगष्ट २०१८ रोजी वीज जोडणी परीपुर्ण अर्ज केला.

अंदाजपत्रक दिनांक ७ सप्टेंबर २०१८ रोजी तो मंजूर करण्यात आला.

अपिलाथीने दिनांक ३ ऑक्टोबर २०१९ रोजी अंदाजपत्रकानुसार रक्कम भरली.

दिनांक २० जानेवारी २020 रोजी वीज जोडणी करण्यात आली.

सबब, वीज जोडणी करण्यास कृती मानके विनियम २०१४ नुसार विलंब झाला याबाबत शंका नाही. या विलंबा बाबत सविस्तर उत्तर प्रतिवादी यांनी दिलेले आहे व मंचाने सुध्दा त्याचा सविस्तर उल्लेख केलेला आहे. शासनाचे वेळोवेळी ठरणारे धोरण व प्रतिवादीचे त्या अनुषंगाने अनुपालन हे अभिप्रेत आहे. पारंपारीक पध्दतीनेच वीज पुरवठा करण्यात यावा ही मागणी बदलत्या तंत्रज्ञानाच्या काळात योग्य आहे असे म्हणणे थोडे धाडसाचेच ठरेल. तरीही प्रतिवादीने अपिलार्थीस सर्व बाबींचा विचार करीता पारंपारीक पध्दतीने कृषीपंपा करीता वीज जोडणी दिली.

कृती मानके विनियम २०१४ मधील विनियम १२.२ नुसार अपिलार्थी यांनी कृषीपंप नवीन वीज जोडणी संदर्भात नमुद केलेल्या विशिष्ट अवधीत वीज जोडणी न दिल्यास त्या अवधीनंतर ६०

दिवसाच्या आत नुकसान भरपाईची मागणी करणे आवश्यक आहे. अपिलार्थी यांनी अशी कोणताही मागणी अर्जाद्वारे प्रतिवादीकडे केली नाही असे प्रथमदर्शनी दिसते. अपिलार्थी यांनी या संदर्भात कोणतीही कागदपत्रे सुध्दा सादर केलेली नाहीत. त्यामुळे अपिलार्थी हे विनियमानुसार नुकसान भरपाईस पात्र नाही.

वरील सर्व बाबींचा विचार करीता अपिलार्थीस नुकसान भरपाई देता येत नाही. मात्र खर्चापोटी रक्कम रु.१०००/- मंजूर करण्यात येत आहे. हि रक्कम प्रतिवादीने अपिलार्थीच्या पुढील वीज देयकात समायोजीत करावी व त्याचा अनुपालन अहवाल दोन महिन्यात या कार्यालयास सादर करावा.

सही/-
(दिपक लाड)
विद्युत लोकपाल (मुंबई)

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai
M.E.R.C.